|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

Department of Lifelong Learning & Extension

जा.क्र. कबचौउमवि/१९ /आ.अ.व वि.वि./वि.उ./२८/२०२६ ई.पत्र सौर, १४ आषाढ, १९४८ शक संवत दि.०६/०७/२०२६

**प्रति,**

**मा.प्राचार्य/ संचालक / विभाग प्रमुख,**

**कबचौउमविशी संलग्नित सर्व महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्था व**

**विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा/विभाग यांना...**

**विषय :- विविध विस्तारीत उपक्रम (Extension Activities) राबविणेसाठी प्रस्ताव सादर करणेबाबत..**

**महोदय/महोदया,**

विद्यापीठ हे समाजातील शिक्षण-प्रशिक्षणाचे प्रमुख केंद्र आहे. औपचारिक अशा पदवी/पदव्यूत्तर अभ्यासक्रमांच्या माध्यमातुन विद्यार्थी वर्गाला शिक्षित व सक्षम बनवण्याचे कार्य विद्यापीठ करतच असते.

शिक्षणाबरोबरीनेच इतर सामाजिकदृष्ट्या महत्वाचे पूरक कार्यक्रम करुन विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीचे भान व जाणिव निर्माण करणे अत्यावश्यक असते. अशा पूरक कार्यक्रमांच्या आयोजनात सहभाग घेऊन, सामील होऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्यास हातभार लागत असतो.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ अन्वये असे उपक्रम विद्यापीठांनी मोठ्या प्रमाणावर राबवावे यासाठी स्वतंत्रपणे आजीवन अध्ययन व विस्तार विभागाची योजना केली आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात हा विभाग पूर्वीपासूनच सुरु असून अनौपचारीक शिक्षणाबरोबरीनेच अनेक समाजोपयोगी उपक्रम पूरक कार्यक्रम (Extension Activities) म्हणून राबवले जातात.

आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे विद्यापीठ परीक्षेत्रातील सर्व महाविद्यालयांना तसेच सामाजिक संस्थांना आवाहन करण्यात येते की, वर उल्लेख करण्यात आल्याप्रमाणे एखादा उपक्रम आपल्या संस्थेस करावयाचा असल्यास तसा प्रस्ताव विभागाकडे पाठवावा.

प्रस्तावात कार्यक्रमाचे सविस्तर स्वरुप, उद्दिष्ट, कार्यक्रम कोणासाठी आयोजित करणार, कार्यक्रमाचे ठिकाण, कार्यक्रमात किती विद्यार्थी/व्यक्ती उपस्थित राहतील याची सविस्तर माहिती द्यावी. योग्य त्या प्रस्तावास कार्यक्रमाचे स्वरुप बघून (अर्धा दिवस/एक दिवसीय) अनुदान देण्यात येईल. **एका शैक्षणिक वर्षात एका हेड खाली फक्त एकच प्रस्ताव सादर करता येईल. प्रस्ताव विभागाचा ई पत्ता directorllleb@nmu.ac.in वर पाठवावा. कृपया कोणीही हार्ड कॉपी पाठवू नये.**

अधिक माहितीसाठी आजीवन अध्ययन व विस्तार विभाग कबचौउमवि,जळगाव येथे ०२५७/२२५७४१५/ ४१६ वर संपर्क साधावा, ही विनंती. कळावे.

**आपला विश्वासू**

**(प्रा. डॉ. मनिष र. जोशी)**

**संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग**

**प्रत: १) मा. जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव:-** उपरोक्त परिपत्रकास विविध वर्तमानपत्रात बातमीच्या रुपात प्रसिध्दी द्यावी ही विनंती.

**२) पध्दती विश्लेषक, संगणकशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव :-** सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रकट करावे.

सोबत:- या अनुषंगाने कोणकोणते विस्तारीत कार्यक्रम आपण आयोजित करु शकतात यासाठी उदाहरणादाखल काही कार्यक्रमांची यादी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या संकेत स्थळावर व या पत्रासोबत उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

---

**Phone-0257-2257415/416** | **वेबसाईट-nmu.ac.in**

**FAX-0257-2258403-406** | **ई.मेल- directorllleb@nmu.ac.in**

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**



'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

## आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

**Department of Lifelong Learning & Extension**

## ज्ञानविस्तार उपक्रम (२०२६-२७)

---

महाविद्यालय/संस्था/विभागाचे नाव :-

उपक्रमाचे नाव/विषय :-

उपक्रमाचा वार, दिनांक :-

उपक्रमाची वेळ व ठिकाण :-

उपक्रमाचे स्वरुप (अर्धा दिवस/पूर्ण दिवस) व नियोजन :-

उपक्रमासाठी/व्याख्यान/मार्गदर्शनासाठी उपस्थित राहणाऱ्या वक्त्यांची नावे :-

उपक्रमासाठी उपस्थित राहणाऱ्यांची संख्या :- पुरुष:- महिला :-

उपक्रमासाठी अपेक्षित असलेल्या अनुदानाचे सविस्तर विवरण :-

१) तज्ञ साधन व्यक्ती मानधन :-

२) सहभागी प्रतिनिंधिंना चहा, नाश्ता व भोजन :-

३) बॅनर व प्रमाणपत्र (गरज भासल्यास), फोटो :-

४) सभागृह, विद्युत व्यवस्था, मंडप, खुर्ची, टेबल, लाऊड स्पिकर (फक्त मान्यता प्राप्त संस्थासाठी) :-

५) एकूण खर्च :-

**उपक्रम समन्वयक**
**नाव, संपर्क क्रमांक, ईमेल आयडी व सही**

**प्राचार्य/अध्यक्ष/विभागप्रमुख**
**सही व शिक्का**

**प्रस्ताव पाठविण्याचा पत्ता :-** मा.संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, पोस्ट बॉक्स नं.८० उमवि नगर कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव पिन-४२५००१

**संपर्क क्रमांक :-** ०२५७-२२५७४१५ व २२५७४१६ **ई.मेल-** directorllleb@nmu.ac.in

**सूचना :-** उपरोक्त प्रमाणे सर्व माहिती आपण आपल्या महाविद्यालय/संस्था/विभागाच्या लेटर हेड वर ई.मेल द्वारा पाठवावी तसेच जलद व सुलभ संपर्कासाठी संबंधित महाविद्यालय/ संस्था यानी नियुक्त केलेल्या समन्वयकांचा सक्रीय मोबईल नंबर व ई.मेल आयडी देणे अत्यंत आवश्यक आहे.

# Extension Activities (विस्तारीत कार्यक्रम)

| Sr. No. | Programmes Name (कार्यक्रमांचे नाव) |
|---|---|
| ०१ | Human Rights (मानवी हक्क ) |
| ०२ | Financial Literacy (आर्थिक साक्षरता) |
| ०३ | Career Guidance (करियर मार्गदर्शन ) |
| ०४ | International Literacy Day (आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस) |
| ०५ | Employment & Entrepreneurship (रोजगार आणि उद्योजकता) |
| ०६ | Nutrition & Health Guidance (पोषण आणि आरोग्य मार्गदर्शन) |
| ०८ | Adolescence Education (पौगंडावस्थेतील शिक्षणा) |
| ०९ | Woman Empowerment & Youth Empowerment (महिला व युवा सक्षमीकरण) |
| १० | Unorganized Workers (असंघटीत कामगार ) |
| ११ | Personality Development (व्यक्तीमत्व विकास ) |
| १२ | Indian Constitution (भारतीय संविधान ) |
| १३ | Marathi Bhasha Gaurav Din (मराठी भाषा गौरव दिन) |
| १४ | Health Literacy (आरोग्य साक्षरता) |
| १५ | Pre- Marriage Counseling (विवाहपूर्व समुपदेशन) |
| १६ | Domestic Violence and Prevention (घरगुती हिंसाचार आणि प्रतिबंध) |
| १७ | Youth Education (तरुण साक्षरता) |
| १८ | National Integration (राष्ट्रीय एकात्मता ) |
| १९ | Reading is Lifelong Learning ( वाचन संस्कृती आणि आजीवन शिक्षण) |
| २० | २१st Century Skills-Technology For Teachers (शिक्षकांसाठी २१ व्या शतकातील कौशल्य व तंत्रज्ञान) |
| २१ | Democracy of India (भारताची लोकशाही ) |
| २२ | Programme on Budget (बजेटवरील कार्यक्रम, अंदाजपत्र ) |
| २३ | Programme on Reading the Constitution (संविधान वाचन कार्यक्रम) |
| २४ | Agriculture Tourism Workshop (कृषी पर्यटन कार्यशाळा) |
| २५ | Legal Literacy (कायदेशीर साक्षरता) |
| २६ | Child Right Protection (बालहक्क संरक्षण ) |
| २७ | Tribal Community Enlightenment (आदिवासी समाजाचे प्रबोधन) |
| २८ | Senior Citizen (ज्येष्ठ नागरिक ) |
| २९ | Competitive Examination (स्पर्धा परिक्षा) |
| ३० | Diet & Health (आहार व आरोग्य) |
| ३१ | Family Squabbles and Prevention (कौटुबिक कलह प्रतिबंध ) |
| ३२ | Family Discord and Restrictions (कौटुबिक कलह आणि निर्बध) |
| ३३ | Tribal Development (आदिवासी विकास) |
| ३४ | National Education Policy (राष्ट्रीय शैक्षणिक धोरण) |
| ३५ | Public Speaking (सार्वजनिक संभाषण ) |
| ३६ | Rich Indian Traditions (समुध्द भारतीय परंपरा) |
| ३७ | Freedom Fighters of India (भारतीय स्वातंत्र्य सैनिक) |
| ३८ | Social Reformers Of India (भारतीय समाज सुधारणा ) |
| ३९ | Sports, Drama & Cultural Courier Guidelines (क्रीडा व नाटक आणि सांस्कृतिक करीयर मार्गदर्शन) |
| ४० | International Mother tongue day (आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन) |
| ४१ | विकसित भारत २०४७; भारतीय ज्ञान परंपरा (Indian Knowledge Tradition) |

*** ही यादी उदाहरणादाखल आहे. याशिवाय आवश्यक व यशोचित असे अन्य स्वरुपांचे कार्यक्रमही आयोजित करता येतील.**